# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

२२ ऑगस्ट, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7447744100 (PRO)


# कोरपना पोलीसांची दारू तस्करी करणाऱ्याविरूध्द कार्यवाही
# २ आरोपींसह १० लक्ष ७३ हजारचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक २१/०८/२०१९ रोजी कोरपना येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, कोरपना येथे दोन वेगवेगळया ठिकाणाहुन दारू तस्करी होणार आहे. अशा माहितीवरून कोरपना पोलीसांनी वनोजा फाटा येथे सापळा रचुन एका संशयीत महिंद्रा झायलो वाहनास थांबवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये अवैध रित्या मोठया प्रमाणात दारूचा साठा मिळुन आला. ज्यामध्ये ३७ बॉक्स देशी दारू किं. २,९६,०००/—रू, एक मंहिद्रा झायलो वाहन क्र. एमएच ४३ सी ४२५८ किं. ७,००,०००/—रू असा **एकुण १०,०३,०००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

दुसरीकडे एक होंडा डिओ कंपनीची मोपेड गाडी ताब्यात घेवुन चालकास विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ३८ देशी दारूच्या निपा किं. ५,७००/—रू, आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेले वाहन किं. ६५,०००/—रू असा **एकुण ७०,७००/—रू** चामुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचे दोन्ही गुन्हे पोलीस स्टेशन कोरपना येथे नोंद करण्यात आल असुन दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही श्री. डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात कोरपना प्रभारी पोनि. श्री. कोसुरकर यांचे नेतृत्वात कोरपना पोलीस स्टेशन येथील कर्मचारी यांनी पार पाडली.

————————————————————————————————————————

# शाळेतील सामानाची चोरी करणार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

दिनांक २७/७/२०१९ रोजी फिर्यादी शिक्षिका, पंडीत दिनदयात शाळा गुरूद्वारा रोड चंद्रपुर यांनी पोलीस स्टशेन रामनगर येथे रिपोर्ट दिली की, कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे शाळेतील कंम्प्युटर रूम मधील एक प्रोजेक्टर, कंम्प्युटर सिस्टीम, होम थिएटर असा एकुण ६५,०००/—रू सामान चोरी करून नेला. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ९७२/२०१९ कलम ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास रामनगर पोलीस स्टेशन आणि स्थागुशा पथक समांतर करीत होते. गुन्हा उघडकीस यावा याकरीता पोलीस पथकाने आपले अथक प्रयत्न तपासादरम्यान सुरूच ठेवले. दरम्यान दिनांक २१/०८/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम तुकुम परिसरात इलेक्ट्रानिक वस्तु विक्री करण्याच्या उद्देशाने फिरत आहे. अशा माहितीवरून स्थागुशा पथकाने तुकुम परिसरात सापळा रचुन एका संशयीत इसमास ताब्यात घेवुन विचापुस करून त्याच्या जवळील प्लास्टिकच्या बॅगची झडती घेतली असता त्यामध्ये इलेक्ट्रानिक वस्तु दिसुन आल्या. त्याबाबत त्याचे कडुन चौकशी केली असता त्याने कबुली दिली की, २० ते २५ दिवसाअगोदर त्याने तुकुम परिसरातील पंडित दिनदयाल शाळा येथील कंम्प्युटर रूमचा ताला तोडुन प्रोजेक्टर, कंम्प्युटर सिस्टीम, होम थिएटर असा सामान चोरी केला होता. यावरून आरोपी नामे मोहम्मद अली सिदद्दीकी अन्सारी वय १९ रा. पंडित दिनदयाल शाळेसमोर, तुकुम चंद्रपुर यास अटक करण्यात आली असुन गुन्हयातील मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, सपोनि. बोबडे, सफौ. पंडीत वऱ्हाटे, पोहवा राजकुमार, पोना. संजय आतकुलवार, अनुप डांगे, पोशि. प्रशांत नागोसे, पोशि. सुरेश यांनी पार पाडली.

———————————————————————————————————